# शिंगणे महाविद्यालयात राष्ट्रीय परिषदेचे आयोजन

**शेगाव (महासागर प्रतिनिधी)** - राज्यशास्त्र प्राध्यापक परिषद, नागपूरसहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे महाविद्यालय, खामगांव आणि ग. भी. मुरारका महाविद्यालय, शेगांव यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवशीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन शिंगणे महाविद्यालय, खामगांव येथे २२ फेब्रुवारी २०२५ रोजी करण्यात आले आहे. या परिषदेत 'महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ ' या विषयावर मंथन होणार आहे. उद्घाटन सत्राचे अध्यक्ष संस्थेचे सचिव डॉ. सद्गुण देशमुख, संजय तिवारी एनडीटीव्ही नागपूर यांच्या शुभहस्ते या परिषदेचे उद्घाटन होणार आहे. शेगांव शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सतिषसेठ मुरारका, सचिव कांतीलाल व्यास तसेच परिषदेच्या अध्यक्षा डॉ. अलका देशमुख इत्यादी मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. परिषदेच्या यशस्वीतेकरिता महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी परिश्रम घेत आहेत.

## - संक्षिप्त वृत्त -

## काळी - पिवळी चालकावर गुन्हा दाखल

**खामगाव** - शेगाव ते मनसगाव रोडवर १६ फेब्रुवारी रोजी घडलेल्या अपघात प्रकरणी शेगाव ग्रामीण पोलिसांनी अपघातास कारणीभूत असलेल्या काळीपिवळी चालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. शेगाव-मनसगाव रोडवरील राधास्वामी सत्संग भवनाजवळ अपघात घडला. गजानन पांडुरंग धोटे (५८) रा. धनगरनगर, शेगाव हे दुचाकीने मनसगाव येथून शेगावकडे जात असताना काळ्या-पिवळी (क्रमांक एमएच २८, आर- २८९५) च्या चालकाने धडक दिली. यात गजानन पांडुरंग धोटे यांना गंभीर दुखापत झाली. अपघातानंतर आरोपी वाहन घेऊन पळून गेला. धोटे यांना उपचारासाठी अकोला शहरातील रुग्णालयात नेण्यात आले. फिर्यादी नकुल गजानन धोटे यांनी शेगाव पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी आरोपीच्या विरोधात कलम २८९, १२५ (ए), ३२४ (२), व इतर संबंधित कलमानुसार गुन्हा नोंदवला.

## टिप्परच्या धडकेने दुचाकीस्वार तिघे गंभीर

**खामगाव** -स्थानिक भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ भरधाव टिप्परने दुचाकीला धडक दिली. यामध्ये कृष्णा पांडुरंग रेठेकर (२०), विनोद बालकिसन चुनेकर (४०), नितिन किसनराव घाडगे (४४) हे तिघे जखमी झाले. त्यांना त्वरीत १९ फेब्रुवारी २५ रोजी मध्यरात्री २ वाजताच्या सुमारास सामान्य रूग्णालयात उपचारार्थ दाखल केले. त्यांची प्रकृती उपचाराला साथ देत नसल्यामुळे प्रथमोपचार करून त्यांना पुढील उपचारासाठी जीएमसी अकोला येथे रेफर केले. दुचाकीला धडक दिल्यानंतर टिप्पर पाणीपुरीच्या गाडीवर जावून धडकले. यामुळे गाडीचा चुराडा होवून नुकसान झाले असून टिप्पर चालकाने घटनास्थळावरून पोबारा केला.

## शिवनेरी लंगर सेवेत सहभागी होऊन रुग्णांना अन्नदान करण्याचे आवाहन

**खामगाव** - शिवनेरी ग्रुपच्या माध्यमातुन सामान्य रुग्णालयातील रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना ६ वर्षापासुन भोजन वाटप करून लंगर सेवा करण्यात येत आहे.

नागरिकांनी आपल्या परिवारातील सदस्यांचा वाढदिवस, पुण्यतिथी, लग्न वाढदिवस आदह प्रसंगी अन्नदान करून शिवनेरी लंगर सेवेत सहभागी व्हावे, यासाठी हनुमंत भोसले ८३२९६७४९१८, डिडवाणिया करण ७२७६५०४६५०, किशोर लोखंडे ७०३०११७२०८, संकेत सुराणा ८८०५३३४५३३, गोलु महातो ८४८५०००७८९ प्रतिक मुंडे, पाटील ९०२२३९४०६६. विजय बोर्ड ८९७५७६५३५१, सुरज वडोदे मो. ९४२३८९३७१५ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.

## खामगाव रत्न कॉ. गोविंद पुरोहित यांना रविवारी सर्वपक्षीय श्रध्दांजली



**खामगाव** - भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे बुलढाणा जिल्ह्याचे माजी सचिव कष्टकरी कामगारांचे नेते कॉ. गोविंद पुरोहीत यांचे २४ जानेवारी रोजी अकोला येथे वृध्दापकाळाने वयाचे ९३ व्या वर्षी निधन झाले आहे. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य कामगार चळवळीला वाहुन दिले.

गुमास्ता कामगार, जिनिंग प्रेसींग, ऑईल मील, कामगारांचा लढा उभारुन हजारो कामगारांना न्याय मिळवून दिला. त्यांच्या संघर्षमय भुमिकेमुळे त्यांना खामगाव पत्रकारिकेकडून 'खामगाव रत्न' या पुरस्काराने गौरविण्यात आले. तसेच कॉ. दत्ता देशमुख विचारमंचाद्वारे त्यांचा नागरी सत्कार करण्यात आला होता. असे संघर्षमुती कॉ. गोविंद पुरोहित यांना २३ फेब्रुवारी रोजी होमिओपॅथीक कॉलेज सिव्हील लाईन खामगाव येथे सकाळी ११ वाजता सर्वपक्षीय श्रध्दांजलीचा कार्यक्रम ठरविण्यात आला असून जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून त्यांना श्रध्दांजली अर्पण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## निधनवार्ता

### रामदास सावरकर



**नांदुरा** - राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे बुलढाणा जिल्हा संघटक गोपाल रामदास सावरकर (खामगाव अर्बन बँक खामगाव चे अधिकारी) यांचे वडील रामदास महादू सावरकर, रा. फणसे प्लॉट, शिवाजी नगर, नांदुरा यांचे वयाच्या ९६ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात बराच मोठा आप्त परिवार आहे.

### मोहनलाल धानुका



**खामगाव** -मोहनलाल हरीराम धानुका यांचे निधन- खामगाव येथील शाकंबरी माता मंदिर चे संस्थापक सदस्य व समाजसेवक, संदीप चे वडील व अक्षत चे आजोबा मोहनलाल हरिराम धानुका (८१) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, सुन, नातवंड असा मोठा आप्त परिवार आहे.

# तीन वेगवेगळ्या अपघातात चार जखमी

**नांदुरा (महासागर प्रतिनिधी)**- जळगाव जामोद रोड वर नवी येरळीनजीक तर निमगाव जवळ दोन दुचाकीस्वारांचा तसेच निमगाव अलमपूर रोडवर गावाकडे जाणाऱ्या पती-पत्नीच्या दुचाकी समोर रानडुक्कर आडवे आल्याने झालेल्या अपघातात पती-पत्नीसह चार जण जखमी झाल्याची घटना १८ फेब्रुवारी २०२५ रोजी संध्याकाळी ६.३०ते ७ वाजेदरम्यान घडल्या.

याबाबत वृत्त असे की तालुक्यातील पातोंडा येथील संजय किसना झाल्टे वय ४० वर्षे व दुर्गा संजय झाल्टे वय ३५वर्षे हे पती-पत्नी आपल्या दुचाकीने निमगाव फाट्यावरून पातोंड्या कडे जात असताना अलमपूर जवळ त्यांच्या दुचाकी समोर



रानडुक्कर आडवे गेल्याने त्यांचे दुचाकी वरील नियंत्रण सुटून अपघात होऊन ते गंभीर जखमी झाले तर दुसऱ्या अपघातात दीपचंद रूपचंद गाडगे वय ७० वर्षे रा हिंगणा बाळापूर यांचा सुद्धा निमगाव जवळ अपघात होऊन त्यात ते जखमी झाले.

तसेच तिसरा अपघात नवी येरळी जवळ घडला असून दीपक माधव खडसे वय ४० वर्षे रा अलमपूर यांच्याही दुचाकीचा अपघात झाल्याने ते सुद्धा गंभीर जखमी झाले अपघातांची माहिती आसलगाव येथील रुग्णसेवक उल्हास माहोदे यांनी देताच शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर युथ फाऊंडेशन, नांदुरा अर्बन बँक कर्मचारी संघटनेची रुग्णवाहिका तसेच कृष्णा नालट यांच्या माऊली ॲम्बुलन्स सर्व्हिस या तिन्ही रुग्णवाहिकांनी घटनास्थळी तातडीने धाव घेत अपघातातील जखमींना येथील रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले यातील तिघांना पुढील उपचारासाठी खामगाव येथे हलविण्यात आले आहे

## श्री संत गजानन महाराज मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलश पूजन



**नांदुरा (महासागर प्रतिनिधी)** - श्री संत गजानन महाराज यांच्या प्रकट दिनानिमित्त श्री संत गजानन महाराज मंदिर संस्थान निमगाव फाटा येथे श्री संत गजानन महाराज यांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा तसेच कलश पूजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये १८ फेब्रुवारी रोजी गावाच्या सर्व प्रमुख मार्गावरून श्री संत गजानन महाराजांच्या मूर्तीची टाळ मृदंगाच्या गजरात भव्य शोभायात्रा काढण्यात आली. तसेच १९ व २० फेब्रुवारी रोजी सर्व नामवंत महाराजांच्या विशेष मार्गदर्शनात होम हवन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच २० फेब्रुवारी रोजी परमपूज्य 'स्वामी वासुदेवानंद सरस्वतीजी महाराज वासुदेव संदीपनी आश्रम निमगाव, परमपूज्य स्वामी १००८ रामचरणदास त्यागीजी महाराज, निमगाव येथील सुप्रसिद्ध ज्योतिष्यकार श्री सुरेश महाराज मुळे यांच्यासह सर्व नामवंत महाराजांच्या प्रमुख उपस्थितीत डॉ. नवीन कुमार दमानी, गजाननराव नाफडे, आशिष इटखेडे, महेश दळवी, निलेश इंगळे, सोपान अवचार, जगदीश चोपडे, विलास चोपडे, वैभव चोपडे, यांचे हस्ते सापत्नीक विधिवत पूजन करून श्री संत गजानन महाराज यांच्या मूर्तीची विधिवत प्राणप्रतिष्ठा तसेच कलश पूजन करण्यात येणार आहे. तसेच २० फेब्रुवारी रोजी भव्य महाप्रसादाने सदर कार्यक्रमाची सांगता करण्यात येणार आहे. तरी पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी या महाप्रसादासह सर्व कार्यक्रमांचा लाभ घेऊन आपल्या जीवनाचे सार्थक करावे असे आवाहन श्री संत गजानन महाराज मंदिर संस्थान निमगाव फाटाच्या वतीने करण्यात आले आहे.

## खैरा येथे लहुजी वस्ताद साळवे यांना अभिवादन



**.नांदुरा (महासागर प्रतिनिधी)**- वीर सावरकर सार्वजनिक वाचनालय खैरा येथे लहुजी वस्ताद साळवे यांचे पुण्यतिथीनिमित्त अभिवादन केले प्रमुख पाहुणे म्हणून गोविंदा भालेराव लाभले होते तर अध्यक्ष म्हणून भूषण ताकतोडे होते सुरुवात लहुजी वस्ताद साळवे यांच्या प्रतिमेला हार अर्पण व ग्रंथपूजन करून करण्यात आली

संचलन संदीप गणगे यांनी केले. प्रास्ताविक विजय गणगे यांनी केले. वाचनालयाचे वतीने मान्यवरांचा ग्रामगीता सप्रेम भेट सत्कार करण्यात आला. यावेळी गोविंदा भालेराव यांनी लहुजी वस्ताद साळवे यांचे जीवन कार्यावर प्रकाश टाकला अध्यक्ष भूषण ताकतोडे यांनी वाचनाचे महत्व विषद करून सांगितले.

यावेळी शिवा भालेराव, महादेव भालेराव, गणेश ताकतोडे, करण ताकतोडे, विशाल ताकतोडे व वाचकवर्ग उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन दीपक गणगे यांनी केले.

## खैरा येथे वृध्दाची गळफास घेवून आत्महत्या

**नांदुरा (महासागर प्रतिनिधी)**- तालुक्यातील ७० वर्षीय वृध्दाने गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना १८ फेब्रुवारी रोजी सकाळी ८.३० वाजेच्या सुमारास उघडकीस आली. मृतक इसमाचे नाव सुखदेव मोरे असे आहे. खैरा येथील सुमेध मोरे यांनी बोराखेडी पोलिसात फिर्याद दिली की, त्यांचे मोठे वडील सुखदेव त्र्यंबक मोरे (वय ७०) खैरा ता. नांदुरा यांनी त्यांचे खैरा गावाचे शेतशिवारातील शेतात गळफास घेतल्याचे दिसून आले. अशा फिर्यादीवरुन बोराखेडी पोलिसांनी मर्ग दाखल केला आहे. आत्महत्येचे कारण मात्र समजू शकले नाही. पुढील तपास पोलिस करीत आहे.

## पत्रयोगी जीवन गौरव पुरस्काराने वृत्तपत्र विक्रेते सन्मानित



**शेगाव (महासागर प्रतिनिधी)** - जिल्हा पत्रकार संघाचे वतीने जिल्ह्यातील ज्येष्ठ पत्रकार व वृत्तपत्र विक्रेत्यांना पत्र योगी जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले हा सोहळा बुलढाणा येथील गर्दी सभागृहात १६ फेब्रुवारी २५ रोजी संपन्न झाला यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते या कार्यक्रमात बुलढाणा जिल्ह्यातील ज्येष्ठ वृत्तपत्र विक्रेत्यांना जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले त्यामध्ये शेगाव येथील पत्रकार वृत्तपत्र विक्रेते प्रकाश उन्हाळे, गोविंदराव धनगर नारायण ठोसरे व बुलढाणा येथील वृत्तपत्र विक्रेते दादा चिंचोळकार, नंदकिशोर चिंचोळकार, उगले काका रवींद्र चिंचोळकर खामगाव येथील अशोकराव तुला की संग्रामपूर येथील केशव घाटे इत्यादींना मान्यवरांची हस्ते पत्र योगी जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले

## कोलते कॉलेज रोजगार मेळाव्यात शेकडो विद्यार्थ्यांना रोजगार



**मलकापूर (महासागर प्रतिनिधी)**- जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल करिअर सेंटर बुलडाणा आणि पद्मश्री डॉ. व्ही. बी. कोलते अभियांत्रिकी महाविद्यालय, मलकापूर यांच्या संयुक्त विद्यमाने ''पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा २०२५'' मोठ्या उत्साहात पार पडला. या मेळाव्यात १३२ विद्यार्थ्यांनी विविध नामांकित कंपन्यांसमोर मुलाखती दिल्या.

यापैकी ५० हून अधिक विद्यार्थ्यांची तात्काळ निवड करण्यात आली, तर काही विद्यार्थ्यांना पुढील टप्प्यासाठी संधी मिळाली.

या कार्यक्रमाचे उद्घाघातान सुधीरभाऊ पाचपांडे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख अतिथी म्हणून एसजीबीएयू, अमरावती विद्यापीठाचे सिनेट सदस्य . राजेंद्रप्रसाद पांडे, सहायक आयुक्त कौशल्य विकास विभाग बुलडाणा, गणेश बिटोड़े, कौशल्य विकास अधिकारी श्रीपाद परडीकर, योगेश लांडेकर उपस्थित होते. मेळाव्यात विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित कंपन्यांनी सहभाग घेतला.

या कार्यक्रमासाठी आयक्यूएसी विभाग प्रमुख प्रा.रमाकांत चौधरी, पॉलिटेक्निक विभाग प्रमुख प्रा. संदीप खाचणे, यंत्र अभियांत्रिकी विभाग प्रमुख प्रा. संतोष शेकोकार, प्रशिक्षण व प्लेसमेंट अधिकारी प्रा. पांडुरंग चोपडे, सिव्हिल अभियांत्रिकी प्राध्यापक प्रा. राजेश सरोदे, तसेच प्रा. सचिन भोळे, प्रा. मनीष आचेलिया आणि प्रा. प्रतीक पाटील यांनी विशेष योगदान दिले.

## छत्रपतींचे आत्मचरित्र वाचन आणि चर्चासत्राने मानवंदना



**बुलढाणा (महासागर प्रतिनिधी)**: छत्रपती शिवरायांची नीती आणि शिवचरित्र स्वयंपूर्ण असून येणाऱ्या पिढ्यांना प्रेरणादाई आहे. पाणी, शेती, कर ,शेतकऱ्यांप्रती जिव्हाळा,सहकार क्षेत्र, धर्माचा आदर, बांधकाम,आरमार,समुद्र तटबंदी आशा सर्वांगीण आघाड्यावर छत्रपती शिवराय आजही अद्वितीय आहे. त्यामुळे छत्रपती शिवरायांनी निर्माण केलेले स्वराज्य जगाला हेवा वाटणारे ठरले.असे मत शिवव्याख्याते ॲड सतीशचंद्र रोठे पाटील यांनी व्यक्त केले.

यावेळी बुलढाण्यातील छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक जयंती उत्सवा दरम्यान आयोजित विविध कार्यक्रमात महत्वपूर्ण कामगिरी बजावणाऱ्या आझाद हिंद महिला संघटनेच्या पदाधिकाऱ्यांचा शिव सन्मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन सुरेखाताई निकाळजे यांनी तर आभार प्रदर्शन आशाताई गायकवाड यांनी केले. यावेळी आयोजक संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व परिसरातील शिवप्रेमी नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

## कोलवड येथे कृषी ड्रोन प्रात्यक्षिक



**बुलडाणा (जिमाका)** - तालुक्यातील कोलवड येथे कृषी विभाग आणि कॉन्फ्लाय डायनॅमिक्स यांच्या पुढाकारांने कृषी ड्रोन प्रात्यक्षिक व जनजागृती शिबिर अत्यंत यशस्वीरीत्या पार पडले.

या कार्यक्रमास शेतकरी, विद्यार्थी आणि कृषी व महसूल विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

हा उपक्रम जिल्हा कृषी कार्यालय आणि कॉन्फ्लाय डायनॅमिक्स यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमास तहसीलदार विठ्ठल कुमरे, कृषी सहाय्यक रवींद्र म्हस्के, कृषी पर्यवेक्षक संदीप आंभोरे, कोलवडचे सरपंच कौतीकराव पाटील, जिजामाता महाविद्यालय प्राचार्य डॉ. सुरेश गवई तसेच प्राध्यापक व महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी प्रगतीशिल शेतकरी साहेबराव पाटील, यांनी या ड्रोन प्रात्यक्षिकाचा अनुभव घेतला. या कृषी ड्रोनच्या प्रात्यक्षिकात औषध फवारणी, पिकांचे आरोग्य परीक्षण आणि अचूक शेती तंत्रज्ञानाचा माहिती देणेयात आली.

कृषी यांत्रिकीकरण उप-अभियानांतर्गत शेतकऱ्यांसाठीच्या शासकीय योजना व अनुदानाची माहिती देण्यात आली. आधुनिक शेती तंत्र आणि कृषी तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञांशी संवाद साधून रोजगाराच्या संधींवर चर्चा करण्यात आली. या प्रात्यक्षिकादरम्यान शेतकरी व विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष सहभागासह प्रश्नोत्तर सत्? घेण्यात आले तसेच ड्रोन शेतीचे फायदे आणि नियमांविषयी माहिती देण्यात आली.

या ड्रोन प्रात्यक्षिकासाठी कृषी विभाग आणि कॉन्फ्लाय डायनॅमिक्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुणाल कस्तुरे पुढाकार घेत त्यांच्या कार्यालयातील कोमल शेलके आणि निलेश बाहेकर यांच्या सहकार्य हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.

## तब्बल १८ वर्षांनी माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा



**जळगाव जामोद (महासागर प्रतिनिधी)**- तालुक्यातील ग्राम धानोरा महासिद्ध येथील महासिद्ध महाराज विद्यालयाच्या सन २००८ सालच्या बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा तब्बल १८ वर्षांनंतर स्नेह मिलनाचा कार्यक्रम दिनांक १४ फेब्रुवारी रोजी पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजनकार सर तर प्रमुख पाहुणे म्हणून वानखडे सर, वसतकार सर, धर्माळ सर, होरोळकर सर, पालकर सर, हिस्सल सर, बोंबटकर सर, या सर्व शिक्षकांची उपस्थिती होती. या सर्व शिक्षकांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. संचालन राजु घुले यांनी केले तर आभार प्रदर्शन वृषालीताई सुरपाटणे व कल्याणी ताई खुपासे यांनी केले. कार्यक्रमाला अविनाश कुले, अमोल जाधव, दिपक अवचार, रवि वावगे ,राजु साबे, किशोर गजगण, ,संतोष सोनोने ,सचिन पाटील, शिवा बघे, किसना बघे, अतुल दाते, सोपान उमाळे, विशाल वावगे, किशोर चंदनकार, धीरज गाडगे ,त कल्याणी खुपासे, वृषाली सुरपाटणे, सारिका गावंडे, अनिता अवचार, भारती गायकवाड, जया वावगे, दीपाली पाटील, मनीषा चंदनकार, वंदना गव्हाळे ,पुष्पा निर्मळ , पुष्पा खेरडेकर, स्वाती खुपसे ,अनिता खापरे ,मीनाक्षी वावगे यांची उपस्थिती होती. १८ वर्षाच्या प्रदिर्घ प्रतीक्षेनंतर सर्व माजी विद्यार्थी व विद्यार्थिनीं एकमेकाना भेटले.

## जाहीर नोटीस

**वि.व्यवहार न्यायाधिश साहेब कनिष्ठस्तर कोर्ट संग्रामपूर**

एम.जे.सी. क्र.१९/२०२५
ने. ता.१०/०३/२०२५
गोविंदा इंगळे +२ विरुद्ध कोणीही नाही.
अर्जदारांकरीता ॲड. एस. आर. गायकी नोटरी संग्रामपूर मो.नं. ८९७५५५२००९

अर्जदार :- १. गोविंद प्रल्हाद इंगळे वय अ ६३ वर्ष धंदा शेती २. गणेश गोंविदा इंगळे वय अ ३७ वर्ष धंदा शेती दोन्ही रा टाकळी पंच ता. संग्रामपुर जि बुलडाणा ३. विठाई अजय पागृत वय अं. २९ वर्ष धंदा घरकाम रा आलीयाबाद अकोला ता जि अकोला

-विरुध्द- गैरअर्जदार :-कोणीही नाही.

अर्ज:- मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ अन्वये वारसा हक्क प्रमाणपत्र मिळणे करीता

या जाहिर नोटीस व्दारे सर्वत्र लोकास कळविण्यात येते की, वयजंतीमाला गोंविदा इंगळे हया मौजे टाकळी पंच ता संग्रामपुर जि बुलडाणा येथील रहीवासी होत्या व त्या दिनांक १६/१२/२०२४ रोजी मौंजे टाकली पंच ता. संग्रामपुर जि बुलडाणा येथे मयत झाल्या असून अर्जदार क्र. १ हे त्याचे पती असुन अर्जदार क्र व २ हा त्यांचा मुलगा असुन अर्जदार क्र. ३ ही त्यांची मुलगी असुन अर्जदार हेच मयत वयजंतीमाला गोंविदा इंगळे याचे कायदेशीर वर्ग १ चे वारस असल्याचे दर्शविण्या करीता तसेच त्यांचे नावे वारसा हक्क प्रमाणपत्र मिळण्या करीता अर्जदार यांनी नमुद प्रकरण वि. न्यायालयात दाखल केले आहे. त्याअर्थी सर्वत्र लोकास सुचीत करण्यात येते की, वरील अर्जदारांनी दाखल केलेल्या प्रकरणातील वारसांच्या म्हणण्या बाबत वारसाहक्क प्रमाणपत्र देण्याबाबत कुणाची, काही हरकत अथवा उजर असल्यास दि. १०/०३/२०२५ रोजी किंवा त्यापुर्वी नेमलेल्या तारखेवर सकाळी ठिक ११ वाजता वि. न्यायालयात हजर होउन त्याने आपल्या हरकती वा उजर प्रकरणात लेखी स्वरुपात सादर कराव्यात, अशी कोणतीही हरकत वा उजर प्राप्त न झाल्यास वरील प्रकरणात पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येउन अर्जदारांना त्यांच्या नावे वारसा हक्क प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दि. ३०/०१/२०२५ रोजी माझे सहीनें व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशावरुन
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय, संग्रामपूर

# महाआवास अभियानातही झोपडपट्टी हटाव का?

महाराष्ट्रात सर्वांसाठी घरे या धोरणांतर्गत महा आवास अभियान सुरू असतानाच अकोला जिल्ह्यातील बाशीर्टाकळी तालुक्यातील महागाव येथील गावठाणाच्या जागेवरील झोपडपट्टीतील ५० घरांचे अतिक्रमण १३ फेब्रुवारीला शासकीय यत्रणेने हटविल्याने घरकुलांचे स्वप्न पाहणारे गरीब बेघर झालेले आहेत. या मुळे सरकारच्या प्रामाणिकपणावरच प्रश्नचिन्ह लागले आहे.

--------------





प्रधानमंत्री आवास योजनेसह विविध शासकीय गृहनिर्माण योजनांची ग्रामीण भागात प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्य सरकार १ जानेवारी ते १० एप्रिल २०२५ या १०० दिवसांच्या कालावधीत महा आवास अभियान राबवित आहे. या अंतर्गत अतिक्रमणधारकांची अतिक्रमणे नियमानुकूल करून लाभार्थींना पक्के घरकूल बांधून देण्याचे लक्ष्य ठरविलेले आहे. परंतु, राज्य सरकारतर्फे हा महत्वाकांक्षी कृती कार्यक्रम सुरू असतानाच झोपडपट्ट्यांचे अतिक्रमण हटविण्याची मोहीम राबविण्यात येत असल्याने या धोरणाबाबतच गरिबांमध्ये संभ्रम निर्माण झालेला आहे.

राज्यातील भाजपा महायुती सरकारने ग्रामीण भागातील बेघर, अतिक्रमणधारकांसाठी नवीन वर्षात सुरू केलेल्या महा आवास अभियानामुळे पक्क्या घरकुलाचे स्वप्न साकारणार अशी आशा बाळगणारे गरिबांवर झोपडपट्ट्यांचे अतिक्रमण हटविणे सुरू झाल्याने बेघर होण्याची पाळी आलेली आहे. महा आवास अभियान सुरू असतानाच अकोला जिल्ह्यातील बाशीर्टाकळी तालुक्यातील महागाव येथील गावठाणाच्या जागेवरील झोपडपट्टीतील 50 घरांचे अतिक्रमण शासकीय यत्रणेने हटविल्याने गरीब बेघर झालेले आहेत. ३५ - ४० वर्षांपूर्वी पासूनची घरे, वीज व इतर सोयी असलेली घरे अतिक्रमण ठरवून हटविलेली आहेत.

ग्रामीण भागात शासकीय जमिनीवर निवासी प्रयोजनार्थ करण्यात आलेली अतिक्रमणे नियमानुकूल करण्याचे शासकीय धोरण असताना महागावातील अतिक्रमित झोपड्या पुनर्वसनाची कोणतीही व्यवस्था न करताच तोडल्यामुळे महा आवास अभियान व सरकारच्या प्रामाणिकपणावरच प्रश्नचिन्ह लागले आहे.

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण), राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना, मोदी आवास योजना,या गृहनिर्माण योजनांसह पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेसह ग्रामीण भागातील अतिक्रमणे नियमानुकूल करण्यासाठी महा आवास अभियान आखण्यात आले आहे. या साठी शासनाच्या ग्रामविकास विभागाने शासन निर्णय, (क्र. प्रआयो-२०२४/ प्र.क्र. १६१/ योजना-१०, दि. १ जानेवारी २०२५) जारी केला आहे.

या अभियांनातर्गत ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामास गतिमान करणे, या मध्ये शासकीय व पंचायत राज संस्थांसह स्वयंसेवी संस्था, सहकारी संस्था, बॅंका, लोकप्रतिनिधी, लाभार्थी व ग्रामस्थांचा सक्रिय सहभाग वाढविणे, जनजागृतीसाठी लोकचळवळ उभारणे, नावीण्यपूर्ण उपक्रम राबवून घरांचा दर्जा व गुणवत्ता वाढविणे आदी उद्दिष्ठ ठविण्यात आले आहेत.

भूमीहीन लाभार्थ्यांना घरकूल बांधकामासाठी जागा उपलब्ध करून देणे, घरकुलांच्या उद्दिष्ठांनुसार १०० टक्के मंजुरी देणे, लाभार्थ्यांना घरकुल मंजुरीचे पत्र त्वरित वितरीत करणे, मंजूर घरकुलांना पहिल्या हप्त्याचे वितरण ७ दिवसांत करणे, प्रलंबित घरकुलांचे काम प्राधान्याने पूर्ण करणे या सह विविध उपक्रम या १०० दिवसात राबविण्याचे उद्दिष्ठ ठरविण्यात आलेले आहे.

सर्वांसाठी घरे धोरणांतर्गत प्रधानमंत्री आवास योजना ( ग्रामीण) मधून ग्रामीण भागातील शासकीय जमिनीवरील निवासी प्रयोजनार्थ केलेली अतिक्रमणे नियमानुकूल करण्याचा शासनादेश २०१८ मध्येच सरकारने काढलेला आहे, या शासनादेशानुसार ग्रामीण अतिक्रमणे नियमानुकूल करून गरिबांना पक्के घरकूल उभारून देण्याचे लक्ष्य ठरविण्यात आले असतानाही अजून पर्यंत अतिक्रमणे पक्की झालेली नाहीत, उलट असंख्य अतिक्रमणे हटविण्यात येत आहेत.

सर्वांसाठी घरे - २०२२ या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामीण भागातील लाभार्थ्यांना अतिक्रमित जागा निवासासाठी उपलब्ध करून देण्याचा राज्य शासनाचा निर्णय आहे.

त्या नुसार राज्यातील शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे नियमानुकूल करण्याबाबत शासन धोरण निश्चित करण्यात आलेले असून या संदर्भात मार्गदर्शक सूचना आणि सर्वंकष कार्यपद्धती २०१८ मध्येच निर्धारित करण्यात आलेली असताना त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणीच अनेक ठिकाणी झालेली नाही. त्या मुळे हजारो अतिक्रमणे नियमानुकूल झाली नाहीत.

निर्धारित कार्यपद्धतीनुसार ग्रामसेवकाने, सन १९९९- २०००, २०१०-२०११, व सन २०१७- २०१८ या आर्थिक वर्षांचे ग्रामपंचायतीमधील नमुना ८ मधील कर आकारणी नोंद, यात सरकारी जागेवर अतिक्रमण असल्याची नोंद घेणे आवश्यक होते.



**अनिल वासनिक**
**ज्येष्ठ पत्रकार,**
**सामाजिक कार्यकर्ता**
**नागपूर.**
**9823286373**

एखाद्या ग्रामपंचायत क्षेत्रात एकही शासकीय जागेवर अतिक्रमण नसल्यास तशी नोंद करणे बंधणकारक आहे.

गावातील अतिक्रमण धारकांची यादी ग्रामपंचायत आम सभेत प्रसिद्ध करणे आवश्यक करण्यात आलेले आहे, परंतु, या कार्यपद्धतीचा अवलंब बहुसंख्य ठिकाणी करण्यात आलेला नाही.

या पूर्वी मागील पंच वार्षिक मध्ये ग्रामीण भागात घरकुलांसाठी २० नोव्हेंबर २०२० ते २८ फेब्रुवारी २१ पर्यंत १०० दिवसांचे महा आवास अभियान राबविण्यात आले होते, तेव्हा राज्यात ८ लाख ८२ हजार घरकूल उभारण्याचे लक्ष्य ठरविण्यात आलेले होते. पण, हे लक्ष्यही अधूरे राहिले होते. आता १ जानेवारी ते १० एप्रिल २०२५ या १०० दिवसांच्या कालावधीतील महा आवास अभियानातही बेघरांसाठी घरकूल उभारण्याचे लक्ष्य निर्धारित केलेले आहे.

ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत पात्र परंतु, घरकुलांच्या बांधकामासाठी जागा उपलब्ध नसलेल्या लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देण्यासाठी पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेसह शासकीय जागा विनामूल्य उपलब्ध करण्यासह अतिक्रमणे नियमानुकूल करून सर्व भूमिहीन लाभार्थ्यांना पक्के घरकूल देण्याचे शासकीय धोरण आहे, पण, त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी दूरच अतिक्रमणे हटविणे सुरू झाल्याने संभ्रम वाढला आहे .

अतिक्रमणे नियमानुकूल होणे शक्य नसल्यास अशा अतिक्रमणधारकांना पंडीत दीनदयाळ उपाध्याय जमीन खरेदी योजनेतून जमीन उपलब्ध करून देऊन त्यांना घरकूल बांधून देणे सरकारी धोरणांतर्गत क्रमप्राप्त असताना पुनर्वसनाची कोणतीही तरतूद न करता अतिक्रमणे हटवून झोपडपट्टीधाकांना बेघर करणे म्हणजे, शासनादेशांची पायमल्ली करण्यासारखे आहे.

जागेची कमतरता व जागांच्या किंमती याचा विचार करून कमी जागेत जास्तीत जास्त लाभार्थींना सामावण्यासाठी नवीन महा आवास अभियानातून बहुमजली इमारती उभारण्याचाही पर्याय ठेवण्यात आलेला आहे. या साठी प्रत्येक जिल्हा परिषद गटामध्ये प्रत्येकी किमान एक बहुमजली इमारत, हाऊसिंग कालनी व हाऊसिंग अपार्टमेंट उभारण्याचे उद्दिष्ठ आहे.

लाभार्थिंच्या घरकूल वसाहती, बहुमजली इमारती यांना दलित वस्ती सुधार योजना, ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजना, महाऊर्जा, जिल्हा परिषद- पंचायत समिती-ग्राम पंचायत सेस, सीएसआर निधी च्या माध्यमातून मूलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

शहरा शेजारील ग्रामीण भागात घरांसाठी जागा उपलब्ध नाहीत. अनेक भागात विकासकांनी जमिनी घेऊन ठेवल्या आहेत. त्यांच्या टोलेजंग इमारती व निवासी संकुले उभी राहत आहेत, गरीब बेघरांना तेथे स्थान नाही. त्या मुळे ग्रामीण गरिबांच्या -बेघरांच्या घरकुलांचा प्रश्न सोडविणे ही सरकारची प्राथमिक जबाबदारी आहे.

महायुतीने आपल्या निवडणूक संकल्पपत्रात प्रत्येकाला अन्न आणि निवारा उपलब्ध करून देण्याची घोषणा केलेली आहे, त्या मुळेच गरिबांच्या निवासाचा प्रश्न सोडविण्यासाठी १०० दिवसांचे महा-आवास अभियान असल्याचा सरकारचा दावा आहे.

या पूर्वीही अनेक आवास अभियान राबवूनही ग्रामीण भागातील हजारो कुटुंबे बेघर आहेत. ग्राम पंचायत स्तरावर करण्यात आलेल्या यादीत अनेकांची नावे नाहीत. स्थानिक राजकारणामुळे अनेकांना यादीतून वगळण्यात येते. त्या मुळे त्यांना घरकूल योजनेपासून वंचित रहावे लागत आहे. अनेक गावांत घरकूल मंजूर झालेले असताना जमिनच उपलब्ध नसल्याने घरकूल साकारत नाही. अतिक्रमणे नियमानुकूल न झाल्याने मंजूर घरकुलांचे काम करता येत नाही, अशा एक ना अनेक अडथळ्यांचा सामना गरीब-बेघरांना करावा लागत आहे.

●●●●●

# काही निवडक बिघडलेली, वेडी माणसं..

ही माणसं अशा कामात गढून गेलेली असतात कि ज्यातून त्यांना स्वतःला काहीच मिळत नाही. उलट पाहणाऱ्यांच्या विचित्र नजरा सहन कराव्या लागतात. तरीही कोणीतरी आज्ञा दिली आहे अशा थाटात ते आपलं काम करत राहतात !!!

१) रायगड १००० वेळा चढून जायचा संकल्प गायक श्री सुरेश वाडकरांनी केला आणि आतापर्यंत साधारणपणे ९०० वेळा ते रायगड चढले आहेत. सोबत अनेकांना घेऊन जातात आणि गड चढताना गडावरच्या पक्ष्यांसारखा आवाजही काढतात. तो आवाज ऐकून पक्षी त्यांना प्रतिसादही देतात.

२) श्री जेधे नावाचा तरुण २७ जानेवारी आणि १६ ऑगस्टला एक गोणी घेऊन बाहेर पडतो आणि रस्त्यात पडलेले झेंडे, तिरंगी बिल्ले गोळा करतो. सायंकाळपर्यंत जमेल तितकं चालत जातो. शेवटी गोणी भरते. त्या गोणीला एक हार घालतो, नमस्कार करतो आणि ती डम्पिंग ग्राउंडवाल्यांच्या ताब्यात देऊन येतो. हे सगळं कशासाठी तर तिरंग्याचा अपमान होऊ नये म्हणून...!!! कचऱ्यातून आपलं अन्न काढतो असे समजून कुत्रे त्याच्यावर भुंकतात. तो हे काम करतो तेव्हा वेडा वाटतो. त्याला ह्यातून काही मिळत नाही, तरीही तो कर्तव्य समजून दोन दिवस काम करतो.

३) डोंबिवलीतही एक वेडे आजोबा आहेत. रेल्वे रूळ ओलांडायला कितीही मनाई केली, दंड केला तरी घाईत असणारे प्रवासी रूळ ओलांडतातच. आजच्या जीवनशैलीमध्ये इतकी धावपळ आहे की प्रसंगी जीवावर उदार होऊन जगावे लागते.

पण डोंबिवलीमध्ये एक आजोबा आहेत, ते काय करतात तर जिथून अनेक लोक रेल्वे रुळांवर शिरतात तिथे सकाळी आडवे उभे राहतात. दोन्ही हात लांब पसरवून ते रेल्वे रुळाकडे येणाऱ्यांना अडवतात. मधेच दोन्ही हात जोडून विनंती करतात की रूळ ओलांडू नका, पुलावरून जा. पण समोर लोकल लागली असल्यामुळे अनेकजण त्यांचे हात बाजूला करून रुळावरून धावत सुटतात.

डोंबिवली हे तर मृत्यू समोर उभा असेल तरी धावणार शहर ! तिथे ह्या आजोबांचं कोण ऐकणार...? तरीही आजोबा नेहमी येऊन उभे राहतात. त्यांना माहित आहे की आज हे रूळ ओलांडतील, पण तसे करणे धोकादायक होते, इतके तरी मनात येईलच. आज रूळ ओलांडले तरी उद्या घरातून लवकर निघतील आणि पुलावरून सुरक्षितपणे जातील.

४) मुंबईच्या लोकलमधून फिरणारा एक असाच वेडा सिंधी...

दिसायला खरंच गबाळा आहे. पण काम फार मोलाचं करतो. ऐन उन्हाळ्यात जेव्हा सगळी लोकल तापते, जीव तहानेने व्याकुळ होतो तेव्हा हा सिंधी डब्यात चढतो.

त्याच्या हातात दोन मोठ्या थैल्या असतात. थैली उघडतो आणि आपल्या चिरक्या आवाजात जलसेवा असे ओरडत तो डब्यामध्ये फिरू लागतो. त्यावेळी त्याने थंड पाणी आणले आहे हे पाहून प्रवासी सुखावतात. पाणी पिऊन तृप्त होतात. एकदा एकाने ह्या सिंध्याला बोलतं केलं होतं. त्याने सांगितलं,

आम्ही सिंधी लोक तहानलेल्याला पाणी देणं ही झुलेलालची सेवा समजतो. आम्ही उल्हासनगरमध्ये खूप प्रॉडक्ट निर्माण केले. ते विकून पैसे कमावले. पण आम्ही कधी पाणी विकलं नाही. पण, अब वक्त बदल गया..., आता प्यायला मोफत पाणी मिळत नाही, खरीदना पडता है.

५) एका दैनिकात एका वाचकाने लिहिले होते की , मी आता ७२ वर्षांचा आहे. ह्या ७२ वर्षात मी एकदाही मातृभूमीवर थुंकलो नाही..!!!

किती छोटी प्रतिज्ञा केली ह्या माणसाने. जमिनीवर न थुंकण्याची ! आज घडीला भारतातील प्रत्येक भाषेत एक वाक्य भाषांतरित झाले आहे आणि ते म्हणजे; थुंकू नका...!!! कोरोनाच्या पार्श्वभूमीवर थुंकणे जास्तच घातक बनले होते ! प्रत्येकाने वरील माणसासारखा ₹वेडा₹ विचार केला तर स्वच्छतेवर होणार प्रचंड खर्च वाचेल.

६) शर्मा नावाचा एक असाच वेडा आहे. तो कुठेही चारचौघात गप्पा मारताना ॲसिडिटी टाळण्याचे उपाय सांगतो - जेवल्यावर लगेच झोपू नका, अति तिखट खाऊ नका. जेलुसील, रॅनटॅक घेण्यापेक्षा डाळिंबाचा रस किंवा कोकमाचा रस प्या, असे उपाय सुचवतो.

सतत मानसिक ताण असलेल्या व्यक्तीला हमखास ॲसिडिटी होते. म्हणून मानसिक ताण असणाऱ्यांनी कोणती योगासने करावीत हे भर रस्त्यावर करून दाखवतो.

म्हणून ह्या माणसाला ॲसिडिटी मॅन नाव पडलं आहे. कोणाची ओळख असो वा नसो हा माहिती सांगितल्याशिवाय राहत नाही. हे सगळं तो का करतो ? तो स्वतः एका मोठ्या कंपनीत केमिकल इंजिनिअर आहे. काही मित्रांना ॲसिडिटी होते हे पाहून ह्याने उपाय शोधले. त्यांना करायला लावले. त्यांचा त्रास कमी होताच ह्याने इतरांना सांगायला सुरुवात केली.

रसायनशास्त्र शिकून पैसे मिळवून झाले, आता समाजासाठी ज्ञानाचा उपयोग करायचा असे त्याला वाटते. वरवर पाहता हा वेडेपणाच आहे. पण ज्याला सतत आम्लपित्ताचा त्रास होतो त्याला शर्मा हवाहवासा वाटतो.

७) असेच एक आहेत डॉ. भरत वटवानी. पती-पत्नी दोघेही सायकिट्रिस्ट आहेत. एकदा त्यांना एक भिकारी दिसला. तो गटारीचं पाणी पीत होता. वटवानींनी त्याला आधी प्यायला शुद्ध पाणी दिलं. मग त्यांना कळलं की हा मुलगा गावातून शहरात आला असून इंजिनिअरिंगची पदवी मिळवली आहे. पण मानसिक संतुलन बिघडले आणि तो शहरभर भिकाऱ्यासारखा फिरू लागला.

डॉक्टरांनी त्याच्यावर उपचार करून त्याला त्याच्या घरी पाठवले. पुढे वटवानी पती-पत्नी रस्त्यावर दिसणाऱ्या अनेक मानसिक रुग्णांवर स्वतःच्या खर्चाने उपचार करत गेले. म्हणून त्यांना Raman Magsaysay पुरस्काराने सन्मानितही करण्यात आले.

ह्या व्यवहारी जगात काही अशी माणसे दिसतात की त्यांनी चालवलेलं काम पाहून त्यांना वेड लागलं असावं असे वाटते.अशी ही बिघडलेली माणसे आहेत. आपल्याला समाज, मातृभूमी, आपला देश खूप काही देत असतो. कृतज्ञता म्हणून आपणही खारीचा वाटा द्यायला हवा हा विचार त्यामागे असतो. अशा वेड्या माणसांमुळेच जग सकारात्मक बनतं.

आपणही पृथ्वीतलावर आलो, भारतात जन्मलो. ह्या समाजाचे, मायभूमीचे पांग फेडण्यासाठी थोडा वेडेपणा करायला हवा.

ही अशी वेडी मंडळी पाहिली की शहाणी माणसे खुजी वाटू लागतात. त्यांचं काम समजून घेतल्यावर लक्षात येतं की, ते जे करतात ती माझीही जबाबदारी आहे.

एक अभंग आहे....;

***आम्ही बिघडलो, तुम्ही बिघडाना***
***नीट वाचलं की समजतं;***
***आम्ही बी घडलो,***
***तुम्ही बी घडाना.....***

■ ■ ■



## सावधान... बनावट अंडे

अंडी हे प्रथिनांचा उत्तम स्रोत आहेत. फक्त २ अंड्यांमधून सुमारे १२ ग्रॅम प्रथिने मिळतात. ंड्यांमध्ये जीवनसत्त्वे, खनिजे आणि निरोगी चरबी असते, जे शरीराला अनेक आजारांपासून वाचवतात.

तथापि, आजकाल बाजारात बनावट अंडी आली आहेत. हे अगदी खऱ्या अंड्यांसारखे दिसतात. हे खाल्ल्याने यकृत आणि मूत्रपिंडाशी संबंधित गंभीर आरोग्य समस्या उद्भवू शकतात. बनावट अंडे हे कोंबडीचे अंडे नाही, तर ते रसायने आणि कृत्रिम पदार्थांपासून बनवले आहे. त्यात पोषक घटक नसतात. बनावट अंड्याचा पांढरा भाग सोडियम अल्जिनेट, जिलेटिन आणि इतर जाडसर पदार्थांपासून बनवला जातो. अंड्याचा पिवळा भाग कृत्रिम पिवळ्या रंगापासून बनवला जातो आणि अंड्याचे कवच कॅल्शियम कार्बोनेट आणि प्लास्टिक सारख्या गोष्टींपासून बनवले जाते. बनावट अंड्यांमध्ये आढळणारा सिंथेटिक रेझिन हा प्लास्टिकसारखा पदार्थ असतो, जो पोटात पचत नाही आणि शरीरात जमा होऊ शकतो. यामुळे आतड्यांसंबंधी आणि पोटाशी संबंधित समस्या उद्भवू शकतात. काही लोकांना सोडियम अल्जिनेटची त्वचेची ॲलर्जी असू शकते, ज्यामुळे त्वचेवर पुरळ, खाज सुटणे किंवा मुरुमे येऊ शकतात. पोटदुखी, डोकेदुखी, चक्कर येणे, मळमळ होणे, अल्सर, आतड्यांमध्ये जळजळ अशा अनेक समस्या या बनावट अंड्यामुळे उद्‌भवू शकतात.

■ ■ ■

# अभिजात मराठीचा मानबिंदू ज्ञानेश्वर

विनयशील वृत्ती, अतुलनीय गुरुभक्ती, मातृहृदयी वात्सल्य, अजोड रसिकता असे व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू असणारे, संपूर्ण जगाला सन्मागार्चा संदेश देणारे कवी संत, ज्यांच्या लेखनातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विलोभनीय दर्शन घडते असे प्रतिभावंत संत ज्ञानेश्वर.

त्यांच्या ओव्यामधून मराठी भाषेविषयीचा अभिमान, भाषेविषयी गौरवोदगार, अमृताशिही पैजा जिंकणारी अशी रसाळ बोली आपल्याला पहायला मिळते आणि अभिजात मराठी भाषेविषयीचा अभिमान मनात जागृत झाल्याशिवाय राहत नाही. ज्ञानेश्वरीमध्ये गीतेच्या सातशे शलोकांवर विस्तारपूर्वक नऊ हजार तेहतीस ओव्या लिहिल्या आहेत.

ज्ञानेश्वरी हा गीतेवरील भाष्यग्रंथ आहे. गीतेमध्ये ७०० श्लोक आहेत. ज्ञानेश्वरीमध्ये गीतेच्या सातशे श्लोकांवर विस्तारपूर्वक नऊ हजार तेहतीस ओव्या रसाळ बोलीत ज्ञानदेवांच्या स्वयंप्रज्ञेने व विविधांगी चिंतनाने लिहिलेल्या असून ओव्या अतिशय परिणामकारक आहेत.स्वतः ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी वयाच्या चौदाव्या वर्षी लिहिली हे ही आपणच मोठ्या अभिमानाने सांगतो. येथे ज्ञानेश्वरीतील अध्याय पहिला यातील ओवी १ते ७ दिली आहे.

*ॐ नमोजी आद्या । वेद प्रतिपाद्या ।*
*जय जय स्वसंवेद्या । आत्मरुपा ॥१॥*

ॐकार हाच परमात्मा आहे असे कल्पून ज्ञानदेवांनी मंगल केले आहे. हे सर्वांचे मूळ असणाऱ्या व वेदांच्या प्रतिपादनाचा विषय असाणाऱ्या ॐकारा, तुला नमस्कार असो. व स्वतः स्वतःला जाणण्यास योग्य असणाऱ्या आणि सर्वव्यापी अशा आत्मरूपी ॐकारा तुझा जयजयकार असो.

*देवा तूंचि गणेशु सकलमति प्रकाशु*
*म्हणे निवृत्ति दासु अवधारिजो जी '२!*

वरील विशेषणांनी युक्त अशा देवा, सर्वांच्या बुद्धीचा प्रकाश जो गणेश तो तूच आहेस. निवृत्तिनाथांचे शिष्य (ज्ञानेश्वर महाराज) म्हणतात, महाराज ऐका.

*हें शब्दब्रह्म अशेष तेचि मूर्ति सुवेष*
*तेथ वर्णवपु निर्दोष मिरवत असे ३*

संपूर्ण वेद हीच त्या (त्या गणपतीची) उत्तम सजवलेली मूर्ती आहे, आणि तिच्या ठिकाणी निर्दोष वर्णरूपी सौंदर्य खुलून राहिले आहे. ॥१-३॥

*स्मृति तेचि अवयवे देखा आंगिकभाव*
*तेथ लावण्याची ठेव` अर्थशोभ !४!*

आता (त्या गणपतीच्या) शरीराची ठेवण पहा. मन्वादिकांच्या स्मृति हेच त्याचे अवयव होत. त्या स्मृतीतील अर्थसौंदर्याने ते अवयव म्हणजे लावण्याची केवळ खाणच बनले आहेत.

*अष्टादश पुराणे तीचि मणिभूषणे*
*पदपद्धती खेवणे प्रमेयरत्नांची !५!*

अठरा पुराणे हेच (त्याच्या) अंगावरील रत्नखचित अलंकार आहेत. त्यात प्रतिपादलेली तत्वे हीच रत्ने व छंदोबद्ध शब्द हीच त्यांची कोंदणे होत.

*पदबंध नागर तेचि रंगाथिले अंबर*
*जेथ साहित्यवाणे` सपूर उजाळाचे !६!*

उत्तम प्रकारची शब्दरचना हेच त्या गणपतीच्या अंगावरील रंगवलेले वस्त्र आहे आणि त्या शब्दरचनेतील अलंकार हे त्या वस्त्राचे चकचकित तलम तंतु आहेत.

*देखा काव्यनाटका जे निर्धारिता सकौतुका*
*त्याचि रुणझुणती क्षुद्रघंटिका अर्थध्वनी !७!*

पहा, कौतुकाने काव्य-नाटकांविषयी विचार केला असता ती काव्य-नाटके त्या गणपतीच्या पायातील लहान घागऱ्या असून त्या अर्थरूप आवाजाने रुणझुणत असतात.

संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांना सर्वसामान्य लोक माऊली या नावानेच हाक मारतात. त्यांच्या विषयी अजूनही सर्व भाविकांच्या मनात एक विलक्षण श्रद्धा आहे.

याचे मुख्य कारण हे त्यांनी केलेले चमत्कार नसून संस्कृतातील भगवद्गीता मराठीत आणण्याचे जे थोर कार्य केले तेच होय. या ग्रंथालाच आपण ज्ञानेश्वरी किंवा भावार्थ दीपिका म्हणतो. ज्ञानेश्वरीविषयीचे महत्त्व सर्वच भाविक, पंडित, तत्वज्ञानी मानतात.


पण ज्ञानेश्वरीच्या अंतरंगात कोण जातो हे सगळ्यात जास्त गरजेचे आहे.सुमारे सातशे वर्षांपूर्वी त्यांनी वापरलेली मराठी भाषा ही आताच्या काळात समजायला खूपच अवघड आहे, तसेच त्यात अनेक उपमा, दृष्टांत असे वापरले आहेत की ते समजावून घेतानाच इतके कठीण जाते तर ते स्वतः समजावून घेऊन इतरांना सांगणे हे आणखी अवघड झाले आहे.

साहजिकच ज्ञानेश्वरीला केवळ नमस्कार करणारेच जास्त आहेत. एकंदर लोकांना ज्ञानेश्वरीविषयी आवड तर वाटतेच पण त्याचजोडीला भाषा व्यत्यय जाणवतो. आपल्यापैकी कोणी अजून सोप्या पद्धतीने या ओव्या समजावून सांगितल्या तर भाषेचा डौल, ढब त्याची क्लिष्टता अजून चांगल्या पध्दतीने समजू शकेल. हीच मराठी अभिजात होण्याची परिभाषा आहे.

---------------

**डॉ. किरण ना. पेठे**

●●●●●





आपण आपल्या आहाराबाबत आता अधिकच जागरुक झालो आहोत. पूर्वी आपण जाड मीठ वाण्याकडून आणायचो, त्याच्या शुद्धतेने आपल्याला काही फरक पडायचा नाही. अजूनही ग्रामीण भागात किंवा आदिवासी भागात असे मीठ वापरले जाते. परंतू त्यानंतर आले टाटाचे शुद्ध मीठ. त्यानंतर पुन्हा मीठात आयोडीन आहे का अशी जाहिरात सुरु झाली. आता तर रक्तदाब आणि मधुमेह असणाऱ्यांना कमी सोडियमचे मीठ खाण्याचा सल्ला दिला जातो.

आपण जे बाजारातून मीठ आणतो त्यात सोडियमचे प्रमाण जास्त असते. म्हणजे त्यात ४० टक्क्यांपर्यंत मीठ असते. आता या मीठातील सोडियमचे प्रमाण करुन त्याला खाण्यायोग्य बनवले जात आहे.आता बाजारात तर अनेक ब्रॅंडचे मीठ आले असून ज्यात सोडियमचे प्रमाण कमी आहे.जागतिक आरोग्य संघटनेने सांगितले आहे की नेहमीच्या मीठा पेक्षा सोडियमवाले मीठ खाणे गरजेचे आहे.सोडियम मीठाच्या बदल्यात आता एलएसएसएसचा वापर करण्याचा विचार करायला हवा आहे.

एलएसएसएस मीठात सोडियम क्लोराईड एक निश्चित टक्के दुसऱ्या खनिज पोटॅशियम क्लोराईडच्याद्वारे बदलली जाते. नियमित मीठाच्या तुलनेत एलएसएसएस मीठाचा वापर केल्यास हृदयविकार आणि स्ट्रोकचा धोका कमी होतो.


डब्ल्यूएचओ संघटनेने २०२२ मध्ये एक मार्गदर्शक दस्ताएवज तयार केला होता. त्यानंतर भारतासह अन्य सदस्य देशांनी तो आत्मसात केला आहे. साल २०२३ पर्यंत सरासरी लोकसंख्येने सोडियम सेवनाचे प्रमाण ३० टक्क्यांपर्यंत कमी करण्याचे लक्ष्य जागतिक आरोग्य संघटनेने निश्चित केले आहे. परंतू हे लक्ष्य गाठण्यात लागलेला वेग पाहाता. त्यामुळे डब्ल्यूएचओ आता कमी सोडियमचे मीठ खाण्याचा सल्ला दिला आहे.

भारतीय बाजारात वेगवेगळ्या ब्रॅंडचे असे मीठ विकले जात आहे, ज्यात १५ ते ३० टक्के सोडियम आहे. परंतू याचे प्रमाण जास्त असल्याने आणि याबाबत कमी जागरुकता असल्याने याचा वापर खूप होत आहे. गुलाबी हिमालयातील मीठ, काळ मीठ, समुद्री मीठ या श्रेणीत येत नाहीत. जागतिक आरोग्य संघटनेच्या जूनी शिफारस ही आहे की कोणत्याही व्यक्तीने प्रतिदिन ५ ग्रॅमहून कमी मीठ (२ ग्रॅम सोडियम) खाल्ले पाहिजे.

**(अधिक माहिती उद्याच्या अंकात)**

■ ■ ■

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

**!! संत गजानन संदेश!!**

हवं तेवढच घ्यावं
आपल्या पत्रावळीत
अन्न जाऊ नये भौ
वाया उष्टावळीत ..

अन्नाची नासाडी नसे
सभ्यपणाचे लक्षण
अन्न हे पुर्णबम्हची
संस्कृती देतसे शिकवण..

उष्ट्या पत्रावळीतील
शितांचे करून भक्षण
अन्नाचा करावा सन्मान
शिकवण देती गजानन...!

## वाचक लिहितात

**श्रद्धेचा अपमान नको, संस्कृतीचा सन्मान हवा!**

एका वृत्तपत्रात शनिशिंगणापूर मंदिर व त्याच्या व्यवस्थेवर केलेली टीका ही भक्तांच्या श्रद्धेचा अपमान आहे. मंदिरातील विश्वस्तांनी ब्रॅंडेड तेल शिळेवर अर्पण करावे, असे आव्हान केले आहे. त्यावर देवाच्या स्वयंभू शिळेतही आता साध्या तेलापासून संरक्षण करण्याची शक्ती उरली नाही. अशी टीका करण्यात आली. असे म्हणणे भक्तांच्या भावनांची थट्टा करणारे आहे.

देवाला अर्पण केल्या जाणाऱ्या वस्तू शुद्ध असाव्यात, हा भाव चुकीचा कसा असू शकतो? आपण आपल्या दैनंदिन जीवनात दर्जेदार वस्तू वापरण्याला प्राधान्य देतो, मग देवासाठीही तसाच विचार करणे चुकीचे ठरते का? देव हा भावाचा भुकेला आहे. आपण जे खातो, तेच देवाला अर्पण करण्याचा भाव असल्यास त्यावर टीका करण्यासारखे काही नाही. देवाची शक्ती कोणत्याही वस्तूंवर अवलंबून नसते, मात्र भक्तांचा भाव टिकून राहावा, तो सतत वाढावा यासाठी परंपरांचे पालन केले जाते.

समाजाला धर्म आणि संस्कृती यांचा सन्मान कसा करावा, हे शिकवण्याची जबाबदारी ही प्रसार माध्यमांची आहे. मात्र अशा लेखांच्या माध्यमातून समाजाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न होत आहे. भक्तांच्या श्रद्धेचा मान राखणे ही प्रसार माध्यमांची जबाबदारी आहे.

■ **सौ. प्रिया बागडदेव, छिंदवाडा.**

